# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०१/०८/२०१८**

## १)सकल मराठा अंदोलना बाबत दाखल गुन्हयाची माहीती :-

**अ) कुंटूर :-** दिनांक ३१.०७.२०१८ रोजी चे ११.१५ वा. चे सुमारास नांदेड ते नायगाव रोडवर काहाळा (खु) नांदेड येथे, यातील अज्ञात आरोपीतांनी सकल मराठा मोर्चातील आंदोलन कर्त्यानी मराठा समाजाला आरक्षण द्या या मागणीसाठी बिलोली ते नांदेड जाणारे परिवहन महामंडळाची बिलोली आगाराची बस क्रमांक एम. एच.-२०/बी.एल.१७२२ मधील प्रवशाना खाली उतरुन सदर बसवर दगडफेक करुन अंदाजे ४,००० /-रुपयाचे शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी नशिब वजिर बिच्छु, वय २९ वर्षे व्यवसाय बस चालक बिलोली आगर रा. फुलवळ ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. कुंटूर** गुरन १२०/२०१८ कलम ३३६, ४२७, ३४, भादवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/ भोळे , मो.क्र. ९४२०४०३५०९** हे करीत आहेत.

**ब) नायगाव :-** दिनांक ३१.०७.२०१८ रोजी चे १२.४५ वा. चे सुमारास आलुवडगाव पाटीजवळ नरर्सी ते मुखेड रोडवर, ता. नायगाव जि. नांदेड येथे, यातील अज्ञात आरोपीतांनी सकल मराठा मोर्चातील आंदोलन कर्त्यानी मराठा समाजाला आरक्षण द्या या मागणीसाठी गैरकायदयाची मंडळी जमवुन नांदेड ते मुखेड जाणारे परिवहन महामंडळाची मुखेड आगाराची बस क्रमांक एम. एच.-१४/बी.टी. १५०३ या बसला आडवुन दगड फेक करुन काचा फोडुन, पेट्रोलची बॉटलीन सदर बसवर पेट्रोल टाकुन वाहक व प्रवाशांना दहशत निर्माण करुन बस पेटवुन देवुन अंदाजे २० ते २५ लाख /-रुपयाचे शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी लक्ष्मण ईश्वर गौंड, वय ३३ वर्षे व्यवसाय बस चालक मुखेड आगार बॅच क्रमांक २०२९१** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. नायगाव** गुरन १०७/२०१८ कलम १४३, १४७, १४९, ३४१, ३३६, ४३६, भादवि व सह कलम ७ क्रिमीनल लॉ अमेंडमेंट अॅक्ट, ३, ४, सा. मा. नु. प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/ थडवे , मो.क्र. ०२४६५-२६२१३३** हे करीत आहेत.

## २) फसवणुक :-

**कुंडलवाडी :-**दि. २२.०६.२०१८ चे १६.०० वा. चे सुमारास माचनुर रेती घाट ता. बिलोली जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन मा. जिल्हाधिकारी सो. नांदेड यांनी दि. २०.०४.२०१८ रोजीच्या आदेशान्वये मांजरा नदीच्या पातरा लगत गट १४ मध्ये ३९५८ ब्रास रेती उत्खनना करीता परवाणगी देण्यात आली होती. सदरच्या रेती उत्खननाकरीता मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन गौण खनिज वाहतुक पावती पुस्तक दिले असता आरोपीने तशाच प्रकारचे बनावट / बोगस गौण खनिज वाहतुक पावती तयार करुन त्याचा टिप्पर क्रमांक १) एम. एच.-०४/एफ. पी. -८८८५ २) ट्रक क्रमांक एम. एच.-२४/ए.बी.-५२९५ चे चालक व मालक यांना कसलीही माहीती न देता गौण खनिज वाहतुकीसाठी त्याचा वापर केला व शासनाची फसवणुक केली. वगैरे वरुन **फिर्यादी गजानन नामदेवराव चमकुरे, वय ३९ वर्षे व्यवसाय नौकरी तलाठी सज्जा माचनुर रा. तिरुमला नगद वाडी (बु). नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. कुंडलवाडी** गुरनं ६३/२०१८ कलम ४२०, ४६४, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भादवी कायदया प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/ कांबळे, मो.क्रं. ९८५०८३०३३६** हे करीत आहेत.

## ३)विवाहितेचा छळ :-

**अ) देगलुर :-** दि. १५.०८.२०१७ ते १९.०७.२०१८ पावेतो मौजे अंतापुर ता. देगलुर जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस, तुझा गळा व आवाज चांगला नाही, तुला काही काम येत नाही म्हणुन मारहाण व शिवीगाळ केली. ॲटो खरेदी करण्यासाठी तुझ्या माहेरकडुन २,००,०००/-रुपये घेवुन आली नाही तर तुला फारकत देतो म्हणुन उपाशी पोटी टेवुन शारिरीक व मानसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **२० वर्षीय वय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. देगलुर** गुरनं. ३२६/२०१८ कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/११९८ कंधारे, मो.क्र. ०२४६३-२५५१००** हे करीत आहेत.

**ब) देगलुर :-** दि. सन २०१२ ते दि. २६.०६.२०१८ पावेतो मौजे बल्लाह ता. भोकर जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस तु दिसायला काळी आहेस, तुला मुलबाळ होत नाही, तु वांजोटी आहेस, तु मला पसंद नाहीस, तु मला पसंद नाहीस, मला कोणीही १०,००,०००/-रुपये हुंडा देवुन लग्न केले असतो. मी तुझ्याशी लग्न करुन फसलो म्हणुन माहेरकडुन १०,००,०००/-रुपये घेवुन ये म्हणुन बसता उठता लाथा बुक्याने मारहान करुन उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व मानसीक छळ केला. वगैरे **२५ वर्षीय वय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. देगलुर** गुरनं. ३२७/२०१८ कलम ४९८(अ), ३२३, ३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/२२३८ कदम, मो.क्र. ०२४६३-२५५१००** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४

**<u>पोलीस अधीक्षक कार्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी.</u>**

दिनांक ०१.०८.२०१८ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती असल्याने पोलीस अधीक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली आहे. मा.अक्षय शिंदे, अपर पोलीस अधिक्षक नांदेड यांचे हस्ते पुष्प हार घालुन अभिवादन करण्यात आले आहे. मा. श्री. ए. जी. खॉन, पोलीस उप-अधिक्षक (मु), मा. श्री अभिजीत फस्के, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर यांनी पुष्प वाहावुन अभिवादन केले आहे. या प्रसंगी श्री.देशपांडे पोनि साहेब जिवीशा, श्री. शेख, श्री. निकाळजे पोनि नियंत्रण कक्ष, नांदेड , श्री . पोकळे, रापोनि, पो.मु. नांदेड श्री.आशोक लाटकर सपोनि, जनसंपर्क अधीकारी, श्री.राठोड, राखीव पोलीस उपनिरीक्षक पोलीस मुख्यालय, नियंत्रण कक्ष येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी, जिवीशा, स्थागुशा, संगणक शाखा, बिनतारी संदेश शाखा, सी.सी.टी. एन. एस. तसेच पोलीस अधीकारी व कर्मचारी व सर्व कार्यालयीन कर्मचारी हजर होते.



**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४

**<u>पोलीस अधीक्षक कार्यालयात " फेक न्युज परिणाम आणि दक्षता" या विषयावर पत्रकारांची कार्यशाळा</u>**

दिनांक ०१.०८.२०१८ रोजी १२.०० ते १३.०० वा. चे दरम्यान चिंतन हॉल पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड येथे "फेक न्युज परिणाम आणि दक्षता" या विषयावर सायबर शाखेचे प्रमुख माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक तथा सायबर महाराष्ट्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मा. बिजेश सिंह यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे नांदेड जिल्हयाचे सायबर शाखेचे प्रमुख श्री राजेंद्र शहाणे पोनि स्थागुशा यांनी पत्रकारांची कार्यशाळा आयोजीत केली होती. कार्याशाळेस मा. अक्षय शिंदे, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड, यांचे अधक्षतेखाली पार पडली. सदर कार्यशाळेस ए. जी. खान, पोलीस उप- अधिक्षक (मु), नांदेड, श्री अल्लुरकर , जिल्हा माहीती अधिकारी नांदेड, श्री अशोक लाठकर, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड व पत्रकारी मंडळी हजर होती. "फेक न्युज परिणाम आणि दक्षता" या विषयावर मा. श्री अक्षय शिंदे, अपर पोलीस अधिक्षक , नांदेड , मा. ए. जी. खान, पोलीस उप- अधिक्षक (मु), नांदेड, पोनि श्री. राजेंद्र शहाणे, यांनी चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४







फेक न्युज
परिणाम आणि दक्षता





**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४